
मराठी साहित्य परिषद
तेलंगण राज्य, हैदराबाद

# पंचधारा

वर्ष ६८ वे, अंक चौथा

जानेवारी २०२६ ते मार्च २०२६
पौष ते फाल्गुन शके १९४७

Peer/Referee reviewed by UGC




## भालचंद्र महाराज कहाळेकर

जन्म : ४ एप्रिल १९१७ • मृत्यू : २८ मे १९७५

संस्थापक : मराठी मंडळ, हैदराबाद

तोडा, चिरा दुग्धधाराच येती
न हे रक्त वाहे शरीरातुनी
''माझी मराठी, मराठाच मीही''
असे शब्द येतील हो त्यातुनी ॥

मराठवाडा साहित्य परिषद
२९ सप्टेंबर १९४३

मराठी साहित्य परिषद,
आंध्र प्रदेश
१९५८

लंगणा राज्य, हैदराबाद

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत
मराठी साहित्य परिषद, (तेलंगण राज्य) या संस्थेचे त्रैमासिक मुखपत्र

# पंचधारा

## कै. भा. शं. कहाळेकर विशेषांक


**वर्ष ६८ वे, अंक चौथा**

**जानेवारी २०२६ ते मार्च २०२६**
**पौष ते फाल्गुन शके १९४७**



**संपादक मंडळ**

**डॉ. विद्या देवधर (प्रमुख संपादक)**
**माधव रामराजे चौसाळकर**
**डॉ. शैलजा जोशी**
**मीना जहागिरदार**
**व्यंकटेश कुलकर्णी**
**डॉ. गायत्री शिरोळे**



**मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य**
इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७
RNI Reg. No. : 32307/79

**कार्यवाह**

म. सा. प. तेलंगण राज्य

४-६-४५८, इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७.

**भ्रमणध्वनी** : ७८४२८५३९८४ / ९२९३५०५०३९

(संपर्क : सायंकाळी ५ ते ८) अन्यवेळी लिखित संदेश पाठवावेत.

**प्रकाशक**

डॉ. विद्या देवधर

**सर्व हक्क** : म. सा. प. तेलंगण राज्य

या अंकात प्रकट झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
फक्त एक व तीन वर्षांची वर्गणी स्वीकारली जाईल.
पंचधारेच्या आर्थिक व्यवहाराचे वर्ष एप्रिल ते मार्च असे आहे.
सर्व सभासदांनी आपले E-mail ID फोन नंबर
पुढील क्रमांकावर पाठवावेत. डॉ. शैलजा जोशी - ९२९३५०५०३९
संपर्कासाठी : MAIL ID : mspaphyd@gmail. com

वार्षिक वर्गणी रु. ४००/- स्पीड पोस्ट सह रु. ६००/-
(एका वर्षातील सर्व अंक स्पीड पोस्टने हवे असल्यास एक वर्षाची वर्गणी)

BHIM UPI
SCAN & PAY

पंचधारा वर्गणी Marathi Sahitya Parishad
IDBI Bank, Sultan Bazar, Kachiguda Branch
A/C. No. 59410010000125
IFSC Code – IBKL0000594
या खात्यावर जमा करावी. मनीऑर्डर पाठवू नये.

वार्षिक वर्गणी रु. ४००/-
तीन वर्षाची वर्गणी रु. १०००/-
आजीव सदस्य वर्गणी रु. ४०००/-
(वर्गणी शक्यतो डी. डी. ने पाठवावी)
बाहेरगावचा चेक असल्यास वटणावळीचे रु. ३५/- अधिक पाठवावेत, ही विनंती
या अंकाचे मूल्य : रु. १७५/-
टपाल खर्च : रु. ५०/-

अक्षरजुळणी आणि मुखपृष्ठ : अमोघ आर्ट्स, एरंडवणे, पुणे ४११००४.

मुद्रक : श्रीगणेश मुद्रणालय, ३५७, शनिवार पेठ, पुणे ३०.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या अंकात प्रकट झालेल्या मतांशी आणि निष्कर्षांशी मंडळ सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


संपादकीय .......................................................... ५

श्रद्धांजली

- पन्नालाल सुराणा ........................ डॉ. नयना जोशी-देशपांडे ....... ७
- एक उमदे व्यक्तिमत्व - जिलानी बानो ........................................ १२

प्रबोधनाच्या **वाटेवर**

- श्री अरविंदांची स्वप्ने व आपले जीवनवास्तव .................... डॉ. वृंदा देशपांडे-जोशी ...... १३
- मुस्लीम सत्यशोधक आणि समाजप्रबोधन . डॉ. बेनझीर तांबोळी .......... २१

**भालचंद्र महाराज कहाळेकर आदरांजली**

- भालचंद्र महाराज कहाळेकर - काही आठवणी ............................ प्रा. न. गो. राजूरकर .......... २९
- मर्मबंधातली ठेव ........................ मधू जामकर .................. ३२<br>शब्दांकन : अश्विनी अयाचित
- प्रा. भालचंद्र महाराज कहाळेकर - एक फणसाळ व्यक्तिमत्त्व ................ भारत देगलूरकर ............... ३६
- 'मराठी साहित्य परिषद'चे शिल्पकार कै. कहाळेकरकाका उर्फ भालचंद्र महाराज कहाळेकर ............... प्रतिभा जोशी .................. ३८
- भालचंद्र कहाळेकरांच्या आठवणी ......... मीना मनसबदार ............... ४२
- प्रा. भालचंद्र कहाळेकर सर - स्मृतिगंध ... प्रा. श्रीमती प्रभा रामकृष्ण नान्नजकर ............... ४७
- अनिलांची कविता - 'सांगाती'च्या निमित्ताने ................. मीना मनसबदार ............... ५०

कहाळेकर **पंचधारा विशेषांक १९७५ : निवडक लेख**

- संपादकीय : भालचंद्र महाराज कहाळेकर आदरांजली... अनंत अरगडे ................ ६२

- हैदराबादेतील मराठी समाजाचे सुहृद श्री. भा. शं. कहाळेकर ........ गो. अ. एकबोटे ........ ६३
- मी पाहिलेले कहाळेकर ........ न. शे. पोहनेरकर ........ ६६
- 'वाङ्मयी तपी' श्री. कहाळेकर ........ प्रा. नरहर कुरुंदकर ........ ७०
- अर्घ्य तुज जोडुनि दोन्ही करा ........ यशवंत कानिटकर ........ ७७
- कहाळेकर : अजोड कार्यकर्ता ........ प्रा. व्यं. द. टिळक ........ ७९
- मराठी साहित्य महामंडळ आणि प्रा. कहाळेकर ........ श्री. शं. नवरे ........ ८३
- मी पाहिलेले भालचंद्र महाराज कहाळेकर .. डॉ. सुरेंद्र बारलिंगे ........ ८५
- निर्मळ मनाचा स्नेही - भा. शं. कहाळेकर ........ भगवंतराव देशमुख ........ ९१
- जी. ए. कुलकर्णी यांची लघुकथा - काही विशेष ........ भा. शं. कहाळेकर ........ ९२

**वेध विदेशी भाषांचा - साहित्याचा**

- विज्ञान आणि संवेदनशीलता यांचा आदर्श वस्तुपाठ - रिचर्ड फेनमन ........ चिन्मय रहाळकर ........ १०२

**ग्रंथपरीक्षणे**

- आनंदाचे डोही आनंद तरंग ........ डॉ. न. गो. राजूरकर ........ १०८
- एक भाकर तीन चुली : जगण्याचा संघर्ष आणि स्त्रीचे अस्तित्व .... डॉ. अमोल सुभाष कवडे ... १२०

**कार्यवृत्त**

- सीतेची गोष्ट - स्त्रीच्या अंतर्मनाचा शोध ... अरुण डवलेकर ........ १२४
- दूर अनावर - एक सुरेल संगीत अनुभव ... अरुण डवलेकर ........ १२७
- श्रीराम शिधये - विज्ञानप्रेमी साहित्यिकाची विशेष भेट ...... उज्ज्वला धर्म ........ १२९

स्वागत नव्या पुस्तकांचे ........ १३२

लेखक परिचय ........ १३३

# संपादकीय

विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून हैदराबादमध्ये मराठी शिक्षण मिळावे, येथील मराठी मंडळींनी एकत्र यावे आणि मराठी साहित्याचे लेखन व वाचन करावे, असा ध्यास काही समाजसेवकांनी घेतला होता. यामध्ये मराठी साहित्य आणि साहित्य संस्था यांच्या दृष्टीने महत्त्वाचे नाव म्हणजे भालचंद्र महाराज कहाळेकर. भा. शं. कहाळेकर यांनी येथील मराठी लोकांसाठी प्रथम 'मराठी मंडळ' स्थापन केले. त्यानंतर 'मराठवाडा साहित्य परिषदे'ची स्थापना केली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर निजामाच्या राज्याची पुनर्रचना झाली आणि मराठवाडा महाराष्ट्रात गेला. मराठवाडा साहित्य परिषदेचे कार्यालय संभाजीनगरला गेले. हैदराबादमधील लोकांनाही मराठी साहित्याबद्दल तेवढेच प्रेम होते. लोकांचे मराठी साहित्यप्रेम वाढीस लागावे यासाठी १९५८मध्ये 'मराठी साहित्य परिषदे'ची स्थापना करण्यात कहाळेकर यांचा सिंहाचा वाटा होता. शिस्तप्रिय परंतु व्यासंगी असे कहाळेकर विद्यार्थिप्रिय होते, उत्तम वक्ते आणि संयोजक होते. आजही जुन्या पिढीतील माणसे कहाळेकरांच्या संघटन कौशल्याची वाखाणणी करतात. २०२५ मध्ये प्रा. कहाळेकर यांच्या निधनाला पन्नास वर्षे झाली, त्यानिमित्त त्यांचे पुन्हा स्मरण व्हावे अशी इच्छा त्यांच्या काही विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

भालचंद्र महाराज कहाळेकर यांचे कार्य ज्यांनी जवळून पाहिले आहे त्यांचे अनुभव, ही या अंकाची जमेची बाजू आहे पण अशी मंडळी फार थोडी आहेत. तरीही कहाळेकरांच्या कामाच्या, व्यासंगाच्या आणि धाकाच्याही आठवणी सांगताना, त्यांच्या कार्याबद्दल नितांत आदर या लेखांमधून व्यक्त झाला आहे. उत्तम शिक्षक असलेल्या कहाळेकरांनी कविता कशी शिकवली होती याचा प्रत्यय देणारा एक लेखही येथे आपल्याला वाचता येईल. वीस-बावीस वर्षांच्या एम. ए.च्या विद्यार्थ्याने एखाद्या कवितेचे रसग्रहण इतक्या समग्रपणे करणे हे त्या शिक्षकाचेच यश असते, असे मानणाऱ्या मीना टिळक-मनसबदार यांनी लिहिलेला तत्कालीन लेख येथे आवर्जून समाविष्ट केला आहे.

मराठवाड्यातील आधुनिक मराठी साहित्याचा पाया रचण्यामध्ये भा. शं. कहाळेकर यांनी अतोनात कष्ट घेतले. प्रा. कहाळेकर यांच्या निधनानंतर १९७५ मध्ये 'पंचधारा'ने 'कहाळेकर स्मृती विशेषांक' प्रकाशित केला होता. स्वातंत्र्यापूर्वी

आणि नंतर, लेखक म्हणून उदयास आलेल्या अनेक लेखकांनी प्रा. कहाळेकरांचे मराठी प्रेम आणि अनेक भाषांवरील प्रभुत्व व्यक्त केले आहे. या विशेषांकात अनेक मान्यवरांचे लेख आहेत. त्यामधील काही लेखातील निवडक भाग आम्ही या अंकामधून आपणापर्यंत पोहोचवीत आहोत. कहाळेकरांच्या समकालीन लेखकांच्या नजरेतून कहाळेकर आणि त्यांच्या विद्यार्थ्यांच्या नजरेतून कहाळेकर असा हा दोन पिढ्यांमधील तुलनात्मक दृष्टिकोण हे या अंकाचे वैशिष्ट्य आहे.

पंचधाराच्या 'प्रबोधन' विशेषांकासंबंधी वाचकांनी आवर्जून प्रतिक्रिया पाठवल्या. यामुळे अंकाच्या प्रयोजनाचे सार्थक झाले. मागील अंकात येऊ न शकलेले, 'योगी अरविंद यांचा पुडुचेरी येथील आश्रम व त्यांचे कार्य' आणि 'मुस्लीम सत्यशोधक समाज' हे दोन लेख या अंकात समाविष्ट केले आहेत. तसेच नेहमीप्रमाणे 'वेध विदेशी भाषांचा', या सदरामध्ये एका वैज्ञानिकाचा परिचय करून दिला आहे. आमच्या विनंतीला मान देऊन भा. शं. कहाळेकर यांचे निजाम कॉलेजमधील सहकारी, ज्येष्ठ लेखक डॉक्टर न. गो. राजूरकर यांनी त्यांच्या काही आठवणी आवर्जून या अंकासाठी दिल्या आणि पुस्तक परीक्षण लिहून दिले, त्याबद्दल त्यांचे विशेष आभार. याशिवाय मराठी साहित्य परिषदेतील विविध कार्यक्रमांची माहिती देत असतानाच हैदराबादमधील अन्य संस्थांचे कार्यवृत्तही नेहमीप्रमाणे आपणापर्यंत पोहोचवीत आहोत.

नेहमीप्रमाणे अंकाची सुबक मांडणी आणि छपाईची काळजी पुण्यातील शिल्प प्रकाशनच्या मंजरी ताम्हनकर यांनी घेतल्याबद्दल त्यांचे आभार! उत्तम मुखपृष्ठ आणि अक्षरजुळणीचे काम केल्याबद्दल अमोघ आर्ट्सचे श्री. घाटपांडे यांचेही आभार. मराठीतील चोखंदळ वाचक आमच्या वेगवेगळ्या विशेषांकांची उत्सुकतेने वाट पाहतात; त्याचे स्वागत करून, उत्तम प्रतिक्रियाही देतात. त्याबद्दल सर्व वाचकांना मनापासून धन्यवाद!

**- विद्या देवधर**

'पंचधारा' संपादक मंडळाकरिता

**मुखपृष्ठाविषयी :**

मुखपृष्ठावर उल्लेख केलेल्या मराठी मंडळ, मराठवाडा साहित्य परिषद आणि मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश या संस्थांच्या स्थापनेत भालचंद्र महाराज कहाळेकर यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

# श्री अरविंदांची स्वप्ने व आपले जीवनवास्तव



डॉ. वृंदा देशपांडे-जोशी

श्री अरविंदांची स्वप्ने समजावून घेताना आपल्याला आधी श्री अरविंदांचे जीवन, त्यांचा पाश्चात्त्य व भारतीय संस्कृतीचा अभ्यास, त्यांच्यातला क्रांतिकारी आणि त्यांच्यातला योगी, त्यांचे 'सावित्री' हे महाकाव्य तसेच श्री अरविंद आश्रमातील माताजींच्या (मीरा अल्फान्सा) नेतृत्व व मार्गदर्शनाखाली झालेले विविध जीवनप्रयोग, 'ओरोविल' या नावाने प्रसिद्ध श्री अरविंद नगरीतील विश्वैक्य साधणारे जीवन आणि 'ऑल लाइफ इज योगा' या संदेशाचा सखोल अर्थ समजावून घ्यावा लागतो. मात्र, एका लेखाच्या आवाक्यात हे सगळे व्यक्त करता येणे केवळ अशक्य आहे. त्यामुळे काही मुद्द्यांना ओझरता स्पर्श करत आपण श्री अरविंदांची स्वप्ने व आपले जीवनवास्तव समजावून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

मानवी जीवनाच्या विकासामध्ये अगदी स्वाभाविकपणाने माणसाने सर्वप्रथम आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याकडे लक्ष दिले, त्यानंतर त्याची विचारक्षमता विकसित होऊ लागली. तो समूहाबरोबर जुळवून घेत जगत असतानाच, स्वतःकडे, स्वतःच्या अंतरंगाकडे अधिक प्रगल्भपणे पाहायला लागला. शरीराबरोबरच मन, प्राण, बुद्धी, आत्मा यांची त्याला ओळख होत गेली आणि त्यातून विकसित झाले योगशास्त्र. महर्षी पतंजली मुनी यांनी दिलेले 'अष्टांग योग' शास्त्र आपण सारेच जाणतो. श्री अरविंद यांनी त्याही पुढे जाऊन जी संकल्पना विकसित केली ती म्हणजे 'पूर्णयोगा'ची संकल्पना - ज्याबाबत असे म्हटले जाते, जिथे सर्व योग संपतात तिथे श्री अरविंदांचा योग सुरू होतो.

पारंपरिक योगशास्त्र हे धर्माच्या माध्यमातून 'मोक्षा'पर्यंत नेणारे आहे. श्री अरविंद यांना मात्र हा 'मोक्ष' किंवा 'जीवनापासून सुटका' अपेक्षित नाही तर उलट मानवी स्वभावाचे रूपांतरण हे दिव्य स्वभावामध्ये व्हावे, त्या दिव्यशक्तीचे अवतरण पृथ्वीवरती व्हावे, पृथ्वीवरच्या माणसाने स्वर्गात जाण्याच्याऐवजी, 'स्वर्गच पृथ्वीवरती नांदावा', अशा प्रकारची अत्यंत सकारात्मक आणि उच्चस्तरीय जीवनाची कल्पना श्री अरविंद यांचा पूर्णयोग

आपल्याला देतो. हा योग साध्य करण्यासाठी आपल्या जाणिवेला अंतरात्म्याकडे वळवणे, ती सर्वव्यापी आत्मतत्त्वाशी एकरूप करून 'सहानुभूती', 'प्रेम', 'सुसंवाद' यामध्ये या जाणिवेचा विस्तार करणे अपेक्षित आहे. श्री अरविंद म्हणतात, 'आध्यात्मिक साधनेची लौकिक व्यवहाराशी आपल्याला सांगड घालता आली पाहिजे. व्यवहार हेच आपल्या शुद्धीकरणाचे, परिवर्तनाचे एकमेव साधन आहे. जडद्रव्याला सर्वथा दोषयुक्त न समजता त्याच्यातही ईश्वराचा अंश आहे याची आपण जाणीव ठेवावी व त्या ईश्वराशी समरस व्हावे.'

प्रत्येक कामात व्यवस्थितपणा, पूर्णता, सौंदर्य आणण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. म्हणजेच सत्य-सुंदर-मंगलाचा नित्य आविष्कार मानवी जीवनात घडत राहिला पाहिजे, ही पूर्णयोगाची मागणी आहे. पूर्णयोगाच्या साधनेत आपली सर्व कामे कर्तव्यबुद्धीने, समर्पण भावनेने करणे हीच खरी ईशसेवा आहे. या ईशसेवेचा आविष्कार प्रत्ययाला येतो तो पुडुचेरी येथील श्री अरविंद आश्रमामध्ये! अनंत आकाशाच्या खाली, अथांग समुद्राच्या काठावर वसलेला पुडुचेरी येथील 'श्री अरविंद आश्रम' हा सामान्य माणसाच्या कुतूहलाचा, अभ्यासकांच्या जिज्ञासेचा, साधकांच्या उपासनेचा आणि मुमुक्षूच्या निरामयतेचा विषय आहे. (दरवर्षी अनेक पर्यटक या ठिकाणी येतात आणि समाधी दर्शनाने विसावतात. 'श्री अरविंद' आणि 'माताजी' ज्या इमारतीत राहत असत आणि जेथे आता त्यांची संयुक्त समाधी आहे हीच आश्रमाची मुख्य इमारत आहे.) 'ज्यांना आपले जीवन भगवंताला वाहण्याची इच्छा आहे', त्यांच्यासाठी हा आश्रम आहे, अशा साध्या-सोप्या पण अगदी स्पष्ट शब्दांत माताजींनी या आश्रमाची संकल्पना विशद केली आहे. या आश्रमाबाबत स्वतः श्री अरविंद म्हणतात, 'सामान्यतः आश्रमासारख्या संस्थांच्या स्थापनेचे जे उद्दिष्ट असते, त्यापेक्षा वेगळ्या उद्देशाने हा आश्रम स्थापन केलेला आहे. जगाचा त्याग करण्यासाठी नव्हे तर एका वेगळ्या प्रकारच्या आणि स्वरूपाच्या जीवनाच्या विकासासाठी साधनेचे एक केंद्र व क्षेत्र म्हणून असे जीवन की, जे सरतेशेवटी उच्चतर आध्यात्मिक चेतनेने परिचालित केले जाईल व अधिक महान आत्मिक जीवन मूर्त करेल.'

श्री अरविंद यांचे बालपणापासूनचे जीवन पाहता त्यांच्या वडिलांनी 'मुलाच्या पाश्चिमात्यीकरणासाठी केलेला आटोकाट प्रयत्न' आणि नियतीने मात्र श्री अरविंदांच्या भाळी लिहिलेला 'भारतीय संस्कृतीच्या विकसनाचा [illegible]

यामधला जबरदस्त संघर्ष दृष्टीस पडतो. वयाच्या एकविसाव्या वर्षी भारतात परतल्यानंतर त्यांच्यातला 'क्रांतिकारक' आणि 'योगी' कसा विकसित झालेला आहे हे त्यांच्या चरित्रामधून मुळातून वाचण्यासारखे आहे. लौकिकदृष्ट्या जन्म-मृत्यूचे संदर्भ पाहता, १८७२ ते १९५० हा श्री अरविंदांचा कालखंड. व्यावहारिक दृष्टीतून त्यांच्या जीवनाचे पैलू पाहता ते विद्यार्थिदशेपासूनच एक व्यासंगी अभ्यासक होते. लहानग्या अरुला भारतीय संस्कृतीचा वाराही लागू नये म्हणून त्यांचे वडील डॉ. कृष्णधन घोष यांनी साऱ्या कडेकोट व्यवस्था केल्या होत्या. वयाच्या सातव्या वर्षापर्यंत त्यांच्या लाडक्या अरुची जडणघडण भारतामध्येच, पण संपूर्ण पाश्चात्त्य वातावरणात झाली. पुढची चौदा वर्षे प्रत्यक्ष पाश्चात्त्य देशात, इंग्लंडमध्ये राहून अनेकविध जागतिक भाषांचा, साहित्याचा, शास्त्रांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. विद्यार्थिदशेतील अरविंदांची विद्वत्ता, तेजस्विता, त्यांच्या वाणी आणि लेखणीचे सामर्थ्य, जागतिक पातळीवरच्या प्राध्यापकांना आश्चर्यमुग्ध करणारे होते.

संपूर्ण पाश्चात्त्य जडणघडणीतला एकवीस वर्षांचा हा युवक १८९३ साली भारतामध्ये परतला. ज्याला मातृभाषेची ओळखही होऊ नये असे जाणीवपूर्वक प्रयत्न केले गेले, तो भावी काळात स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा यांचा उद्गाता झाला. आय.सी.एस.च्या नोकरीवर जाणीवपूर्वक पाणी सोडणाऱ्या या युवकाला पाश्चात्त्य देशातच मातृभूमीचे वेध लागले होते. ही आंतरिक ओढ एवढी जबरदस्त होती की, आपले सर्वस्व त्यांनी मातृभूमीच्या चरणी समर्पित केले. त्यांच्या वाणी आणि लेखणीला तलवारीची धार होती. जहाल गटातून नेतृत्व करत अनेकांच्या नव्हे तर अवघ्या चळवळीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहात भारतीय स्वातंत्र्याचा कैवार त्यांनी घेतला. परदेशात राहून भारताच्या आणि भारतीयांच्या स्थितीबाबत जे काही कळत होते, ते आत खोलवर पोहोचले. वयाच्या तेराव्या वर्षापासून क्रांतिकारी संघटनांशी आलेल्या संबंधाने स्वातंत्र्याची जाणीव प्रखर होत गेली आणि त्यातून जन्म झाला एका क्रांतिकारकाचा!

भारतात परतल्यावर सुरुवातीला महाराज सयाजीराव गायकवाड यांच्याकडे रु. २००/- एवढ्या अल्प मासिक वेतनावर त्यांनी नोकरी केली. पुढे बडोदा महाविद्यालयात फ्रेंच आणि इंग्रजी भाषेचे प्राध्यापक म्हणून काम केले. या कामात त्यांना स्वधर्माचा साक्षात्कार घडला. या काळात त्यांच्या संपादक मित्रानी त्यांना 'इंदुप्रकाश' या नियतकालिकातून लेखनाची विनंती केली. 'New

Lamps for Old' या त्यांच्या लेखमालेने तत्कालीन काँग्रेसच्या मवाळ राजकारणावर टीकास्त्र सोडले. केवळ मध्यमवर्गीयांच्या वर्तुळात वावरणारा हा पक्ष देशाला स्वातंत्र्य मिळवून देऊ शकेल का हा प्रश्न त्यांच्यापुढे होता. जनसामान्यांची जडमूढता दूर करून त्यांना जागृत आणि संघटित करून आपल्या सोबत घेतल्याशिवाय काँग्रेसला पर्याय नाही, हे त्यांच्या प्रतिपादनाचे सार होते.

१९०३मध्ये सयाजी राजांबरोबर ते काश्मीरला गेले तेव्हा तिथल्या प्रसन्न परिसराच्या दर्शनाने त्यांचे देहभान हरपून गेले आणि क्षणात निर्मम आणि निर्मन झाले. असीम आणि अथांग अनंताचा त्यांना प्रत्यय आला. निर्गुण-निराकार ब्रह्माच्या या अनुभवाने श्री अरविंद योगशास्त्राच्या अभ्यासाकडे वळले. रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद हे या मार्गावर त्यांचे मार्गदर्शक झाले. सारी भयभीत मानवता आत्मरक्षणासाठी भारताच्या आध्यात्मिकतेच्या आश्रयास येऊन उभी राहील, असे भविष्य या मार्गदर्शकांनी वर्तवले. या संदेशाने प्रभावित झालेल्या श्री अरविंद यांनी आपल्या मनाशी निष्कर्ष काढला, 'भारताला आपले गतवैभव पुन्हा प्राप्त झाले पाहिजे. ही पारमार्थिकाची भूमी स्वतंत्र झाली पाहिजे. देशाचे बंध विमोचन हेच आपले जीवितकार्य झाले पाहिजे.' श्री अरविंदांनी भूमिगत चळवळींचे सूत्रधारपद स्वीकारून, प्राणशक्तीसारखे अदृश्य राहून स्वातंत्र्यचळवळीला चैतन्य पुरवले. देशातील युवाशक्तीला जागृत, संघटित आणि कार्यरत केले. वंगभंगाच्या घटनेकडे आध्यात्मिक सकारात्मकतेने पाहात, बंगालच्या कुरुक्षेत्रात ते उतरले. महाविद्यालयातून राष्ट्रीय शिक्षणाचे तर 'युगांतर', 'वंदे मातरम्' या वर्तमानपत्रांच्या अग्रलेख लेखनातून त्यांनी बिनभिंतींच्या उघड्या जगात लोकशिक्षणाचे कार्य केले.

याच काळात, राजकारणासाठी योगसाधना केली पाहिजे असा स्पष्ट निर्वाळा त्यांच्या अंतःप्रेरणेने दिला. योगी विष्णू भास्कर लेले या गुरूंच्या मार्गदर्शनाने अवघ्या तीन दिवसांत योगशास्त्राच्या सामर्थ्याचा प्रत्यय श्री अरविंद यांनी घेतला. या साधनेने मन कोरेकरकरीत झाले आहे आणि ते निर्विचार शब्दरहित दशेस येऊन पोहोचले आहे, असा प्रत्यय त्यांना आला. त्या नितळ मनात मग स्वच्छ आणि स्पष्टपणे उमटत गेले भगवंताचे आदेश. ज्यातून स्वातंत्र्याला अर्थ प्राप्त होत गेला, मानवाच्या असीम प्रगतीचा! त्याचे प्रत्यंतर देणारे उत्तरपारा येथील त्यांचे भाषण, अलीपूर कारागृहातील अनुभव या

पाऊलखुणांचा वेध घेत थेट 'सावित्री' महाकाव्यातील अद्‌भुत आणि सर्व योगांच्या पलीकडे नेणाऱ्या पूर्णयोगापर्यंत आपण पोहोचू शकतो.

प्रशासकीय कामकाज, प्राध्यापक, संपादक, लोकनेते, क्रांतिकारी, मार्गदर्शक, लेखक, कवी, योगी अशा नियतीने वाट दाखवलेल्या सर्व भूमिका श्री अरविंदांनी तन्मयतेने पार पाडल्या. खरे म्हणजे हे एक असे व्यक्तिमत्त्व आहे, जे मनाला भुरळ घालते, हृदयाला ओढ लावते आणि बुद्धीला प्रेरित करते. त्यांचे व्यावहारिक अनुभवविश्व तर्कशुद्धतेच्या, शास्त्रीयतेच्या, बुद्धिप्रामाण्याच्या आधारावर चालणारे आहे. ते व्यक्तित्व हे लौकिकाशी संवादी राहात, पारलौकिकाची उंची गाठणारे आणि पुनः लौकिकाला समृद्ध करणारे आध्यात्मिक अनुभवविश्व; इंद्रियगोचरतेच्या पलीकडच्या विश्वाचे गूढ उलगडून त्या दैवी शक्तीने लौकिक जगाला समृद्ध करणारे आहे. अशा व्यक्तीच्या स्वप्नांचा वेध घेणे किती मनमोहक, बुद्धिवर्धक आणि लाभदायक असू शकते हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

१५ ऑगस्ट हा श्री अरविंद यांचा जन्मदिन; हाच भारताचा स्वातंत्र्यदिन ठरावा यामध्ये नियतीचे फार मोठे संकेत दिसतात. या गोष्टीला श्री अरविंद स्वतः हा अटळ योग म्हणजे, त्यांच्या कार्याला मिळालेला, भारताच्या आध्यात्मिकतेला मिळालेला दैवी कृपेचा आशीर्वाद समजतात. अखिल भारतीय रेडिओ, तिरुचिरापल्लीच्या विनंतीवरून स्वातंत्र्याच्या वेळी श्री अरविंद घोष यांनी एक संदेश दिला होता. तो १४ ऑगस्ट १९४७ रोजी प्रसारित करण्यात आला. भारतीयांना दिलेल्या या संदेशात श्री अरविंद यांनी आपली काही स्वप्ने शब्दांकित केली होती. 'स्वतंत्र आणि अखंड भारत निर्माण करणारी क्रांतिकारी चळवळ', हे श्री अरविंद यांचे पहिले स्वप्न होते. भारताला स्वातंत्र्य मिळाले परंतु संस्थानांच्या विलीनीकरणाचा, भारताच्या एकतेचा प्रश्न समोर आला. मात्र, कणखर धोरणांमुळे संस्थानांचे विलीनीकरण घडून आले. फाळणी होऊन देशाचे राजकीय विभाजन झाले. श्री अरविंद त्या वेळी म्हणाले, 'ही स्थिती दीर्घकाळ अशीच राहणार नाही, राहता कामा नये. कारण त्यामुळे भारताच्या अंतर्गत विकासाला, भरभराटीला अडथळे निर्माण होऊ शकतात. म्हणून भारताला पुन्हा एक व्हावे लागेल आणि ते नैसर्गिकरीत्याच घडले पाहिजे, भारताच्या उज्ज्वल भवितव्यासाठी ते आवश्यक आहे.'

'आशिया खंडाचे पुनरुत्थान' हे श्री अरविंदांचे दुसरे स्वप्न होते. आशिया खंडाचे सारे भवितव्य भारताच्या स्वास्थ्यावर अवलंबून आहे असे श्री अरविंद

यांचे मत होते. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक स्थानामुळे एकात्मतेचा प्रयोग केवळ भारतातच पार पडू शकेल, असा आत्मविश्वास त्यांना वाटे. प्राचार्य शिवाजीराव भोसले नमूद करतात, 'श्री अरविंदांना भारताचे स्वातंत्र्य हवे होते ते आशियाच्या उत्थानासाठी व आशियाचे उत्थान हवे होते ते मानवजातीच्या कल्याणासाठी. आशियाच्या ऐतिहासिक भूमिकेचे मूल्यमापन करताना Asia is the custodian of the world's Peace of mind the position of the maladies which Europe generates. अर्थात संस्कृतीने जन्मास घातलेल्या व्यथांचे निदान आणि निराकरण करणारा धन्वंतरी म्हणजे आशिया. जगाचे वैचारिक आध्यात्मिक नेतृत्व हीच भारताची नियत आणि ईश्वरप्रणीत भूमिका आहे अशी त्यांची श्रद्धा होती.'

त्यांचे तिसरे स्वप्न हे 'वैश्विक ऐक्या'चे आहे. हे 'वैश्विक ऐक्य' संपूर्ण मानवजातीसाठी न्याय्य, उज्ज्वल आणि उदात्त जीवनाचा वाढता आधार असेल. एकीकरण ही निसर्गाची गरज आहे. या आंतरिक गरजेतूनच सुसंगती साधत असते. 'व्यष्टी, समष्टी, आणि सृष्टी' यांचा एकत्रित विचार करणाऱ्या भारताने यात महत्त्वाची भूमिका बजावायला सुरुवात केली आहे. जर भारत सध्याची तथ्ये आणि क्षणिक शक्यतांच्या मर्यादा ओलांडून, पुढे जाऊन भविष्याचा वेध घेणारे मुत्सद्दीपण विकसित करू शकला तर भारत जगाच्या विकासाच्या प्रक्रियेत आणि वेगात फरक घडवून आणू शकतो. या वैश्विक ऐक्याशिवाय लहान राष्ट्रांचे स्वातंत्र्य आणि मोठ्या, शक्तिशाली राष्ट्रांचे जीवनसुद्धा सुरक्षित राहणार नाही.

भारताने जगाला दिलेल्या आध्यात्मिक भेटीच्या संदर्भात श्री अरविंदांचे चौथे स्वप्न आहे. त्यांनी योगशास्त्राचा अभ्यास सुरू केला आणि रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंदांचे पारमार्थिक मार्गदर्शन त्यांना मिळण्यास प्रारंभ झाला. 'मुक्तिगाथा महामानवाची' या श्री अरविंदांच्या चरित्रात लेखक नोंदवतात, 'रामकृष्ण- विवेकानंदांनी भारताच्या उत्थानाचा मंत्र जपला. आध्यात्मिकता हेच भारतीय जीवनाचे सारभूत तत्त्व असल्याचा त्यांनी निर्वाळा दिला आणि ज्वालामुखीच्या कड्यावर उभी असणारी भयभीत मानवता आत्मरक्षणासाठी भारताच्या आध्यात्मिकतेच्या आश्रयास येऊन उभी राहील असे भविष्य वर्तवले.' या संदेशाने प्रभावित झालेल्या श्री अरविंदांनी 'भारताला आपले गतवैभव पुनः प्राप्त झाले पाहिजे', हा ध्यास घेतला. आपल्या योगाभ्यासाने तो सिद्धीस नेला. तो ध्यासच, स्थळकाळाची बंधने ओलांडू

चिरंतन चैतन्याचा स्पर्श करत भारताला प्रगतिपथावर नेत आहे आणि जगाला मार्गदर्शक होत आहे.

श्री अरविंदांचे पाचवे म्हणजे अंतिम स्वप्न हे उत्क्रांतीचे एक असे पाऊल आहे जे मनुष्याला उच्च आणि मोठ्या चेतनेकडे घेऊन जाणारे आहे. (ज्या समस्यांनी मानवाला गोंधळात टाकले आणि निराश केले त्या सर्व समस्यांचे निराकरण मानवी जाणिवेच्या उन्नयनातून सुरू करणारे आहे.) याचे उत्कृष्ट उदाहरण पुडुचेरी आश्रमात दिसते. 'हाती काम, मुखी नाम, मनी धाम श्रद्धेचे' ही आश्रमवासीयांची आचारसंहिता आहे. तिथे कर्म हीच उपासना मानली जाते. तिथे पदाचा, सत्तेचा, संपत्तीचा, आध्यात्मिकतेचा कोणताही अहंकार न बाळगता प्रत्येक जण श्रमदान करतो. १९२६मध्ये श्री अरविंद पूर्णपणे एकांतवासात गेले. तेव्हापासून माताजी, 'श्री अरविंद आश्रमा'ची व्यवस्था पाहू लागल्या. प्रत्येकाची आंतरिक क्षमता पाहून माताजी त्यांना आश्रमात राहण्याची अनुमती देत किंवा नाकारत. आश्रमात तुम्ही 'कोणत्या वृत्तीने' काम करता याला महत्त्व असते, तुम्ही कोणते काम करता याला महत्त्व दिले जात नाही.

आश्रमामध्ये दोन मोठे छापखाने आहेत. 'अरविंद आश्रम प्रेस' आणि 'ऑल इंडिया प्रेस'. यामधून बारापेक्षा अधिक भाषांमधून आश्रमाच्या पुस्तकांची आणि नियतकालिकांची छपाई होते. इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, संस्कृत, हिंदी, बंगाली, उडिया, गुजराती, तामीळ, कानडी, तेलुगू, मराठी इत्यादी भाषांमधून ही छपाई होते. आश्रमाचा एक 'हॅन्ड मेड पेपर' बनवण्याचा कारखाना आहे. कापड विणण्याचा तसेच शिवणकाम, भरतकाम, मार्बलिंग, आर्ट गॅलरी यांचे निरनिराळे विभाग आहेत.

आश्रमामध्ये चार दिवस 'दर्शन दिन' म्हणून साजरे केले जातात. २१ फेब्रुवारी - श्री माताजींचा जन्मदिन, २४ एप्रिल - श्री माताजींचे भारतात कायमचे आगमन, १५ ऑगस्ट - श्री अरविंद यांचा जन्मदिन आणि २४ नोव्हेंबर - श्री अरविंदांचा सिद्धिदिन. याप्रसंगी पाहुण्यांची अधिक गर्दी असते. निरनिराळ्या अतिथीगृहातून पाहुणे मंडळींची सोय केली जाते.

पुडुचेरी आश्रमात काय नाही? सर्व काही आहे. बालक मंदिरापासून महाविद्यालयापर्यंत शिक्षण देणाऱ्या संस्था, विद्यार्थ्यांना हवी असणारी पुस्तके छापण्यासाठी छापखाना, सुतारकामाची शाळा, लोहारकामाची पाठशाळा, भरतकाम, विणकाम, नृत्य शिकवणारी कलामंदिरे, साधकाला जे जे लागते ते

तेथेच निर्माण केले जाते. श्रमाशिवाय कोणालाही राहता येत नाही. 'कामासाठी काम' हेच येथील वर्तन सूत्र आहे. 'To work for the Divine is to pray with the body' हे माताजींचे वचन प्रत्येकाच्या अंतर्मनावर कोरलेले आहे. 'गरजेपुरते घ्यावे, ज्याची गरज तेच घ्यावे, गरजेच्या वेळीच ते घ्यावे', हा साधारण संकेत सर्व जण सांभाळतात. आपणही आश्रमवासीयांना अनुसरू शकलो तर मानवी जाणिवा उन्नत होऊन आपल्या सर्व समस्यांचे निराकरण होईल.

या दृष्टीने युवकांना तयार करण्याचे काम श्री अरविंद आश्रमाच्या माध्यमातून केले जाते. पुडुचेरी, नैनिताल, कर्नाटक, आंध्र प्रदेश, वाराणसी, मुंबई, नोएडा आदी विविध ठिकाणी ही युवा शिबिरे होतात. काही ठिकाणी जुलै-ऑगस्टमध्ये शिबिरे होतात तर काही ठिकाणी डिसेंबर-जानेवारी या महिन्यांमध्ये होतात. या शिबिरांची माहिती आश्रमाच्या व संबंधित केंद्रांच्या वेबसाइटवर उपलब्ध असते. या शिबिरांच्या माध्यमातून तरुणांना त्यांच्या जीवनध्येयाबाबत जागरूक केले जाते. व्यक्तिगत, भौतिक व आध्यात्मिक प्रगतीबरोबरच सामूहिक जीवनाबाबत सजग केले जाते. सभोवतीचा समाज, देश, जग यांच्याबाबतची संवेदनशीलता वाढवून मानवी विकासासाठी, सृष्टीच्या कल्याणासाठी युवा पिढीत कर्तव्य व कर्तृत्व जागृती करण्याचे काम ही शिबिरे करतात. हे सर्व अव्याहतपणे चालणारे काम पाहून श्री अरविंद यांनी 'सावित्री' महाकाव्यातून व्यक्त केलेले परिवर्तनाचे सूत्र निश्चितच साकार होईल असा विश्वास वाटतो. ते लिहितात -

*पीछे छूटेगी अज्ञान की सीमाएं,*
*प्रकाश में प्रवेश करेगी अधिकाधिक आत्माएं,*
*जियेगी प्रकृति अभिव्यक्त करने रहस्यमय प्रभु को*
*करने लगेगा मानव लीला स्वयं आत्मतत्व ही,*
*हो जाएगा पार्थिव जगत् रूपांतरित दिव्य जीवन में ।*

(सावित्री महाकाव्य - श्री अरविंद)

आज जग निश्चितपणे या मार्गावर वाटचाल करीत आहे.